N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**

प्रथम खबर अहवाल

**(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)**

1. **District (जिल्हा):** औरंगाबाद ग्रामीण **P.S.(ठाणे):** वैजापूर **Year (वर्ष):** 2020

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0416 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 24/12/2020 22:16 बजे

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** गुरूवार **Date From (दिनांक पासून):** 24/12/2020

**Time Period (कालावधी):** पहर 6 **Date To ( दिनांक पर्यंत):** 24/12/2020

**Time From (वेळेपासून):** 17:55 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 17:55 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 24/12/2020 **Time (वेळ):** 22:07 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ**

**Entry No. (नोंद क्र.):** 038 **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 24/12/2020 22:07 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):** दक्षिण, 500 किमी

**Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** पंचायत समिती वैजापूर

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** केशव बाळासाहेब चव्हाण

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1981 (d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):** **Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**
**ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

(h) **Address (पत्ता):**

| S.No.(अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | जिवनगंगा सोसायटी वैजापुर,वैजापूर,औरंगाबाद ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | जिवनगंगा सोसायटी वैजापुर,वैजापूर,औरंगाबाद ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल नं.):** 91-9404015301

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | रामु सोनाजी दाभाडे | | | 1. टिव्ही सेंटर पवण नगर औरंगाबाद , सिडको ,औरंगाबाद शहर,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | लाचेची मागणी | 1,800.00 |

10 **Total value of property (In Rs/-)-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):** 1,800.00

11 **Inquest Report / U.D. case No., if any (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12 **First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद दिनांक 24/12/2020.मी केशव बाळासाहेब चव्हाण वय 39 वर्ष, व्यवसाय शिक्षक रा.जिवनगंगा सोसायटी वैजापुर जि.औरंगाबाद मो .9404015301 मी वरील ठीकाणी पत्नी व मुलाबाळासह राहत असुन मी जि.प कोल्ही येथे शिक्षक म्हणुन नोकरी करतो. दिनांक 21/12/2020 ते 24/12/2020 रोजी वैजापूर येथे वेतन आयोगा व चेटटोपाध्याय वरिष्ठ वेतन बाबत कॅम्प आयोजीत केला असल्याने मी माझे सहाव्या,सातावा वेतन आयोगा व चेटटोपाध्याय वरिष्ठ वेतन श्रेणी (सेवापट पडताळणी) करीता मी दिनांक 22/12/2020 रोजी पंचायत समीती कार्यालय वैजापुर येथे गेलो असता श्री.दाभाडे कनिष्ठ साहाय्यक यांनी मला तुमचे सहाव्या वेतन आयोगाचे सेवापटाची पडताळणी करण्यासाठी 1000/ रुपये दयावे लागतील त्यामुळे मी श्री दाभाडे यांना नाईलाजाने ठीक आहे म्हणुन निघुन आलो होतो. माझ्या कडे श्री दाभाडे कनिष्ठ सहाय्यक यांनी लाचेची मागणी करुन मला दिनांक 24/12/2020 रोजी भेटण्यासाठी बोलावले होते परंतु माझी श्री दाभाडे कनिष्ठ सहाय्यक यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने मी दिनांक 24/12/2020 रोजी पोलीस निरीक्षक, श्रीमती सुर्यवंशी मडम यांना भेटुन त्यांना लेखी स्वरुपात तक्रार दिली होती तेव्हां तेथे हजर असलेल्या पंचाशी त्यांनी माझी ओळख करुन दिली व माझा अर्ज त्यांना वाचण्यास दिला त्यांना माझा अर्ज वाचण्यास दिला त्यानंतर माझे तक्रारी अर्जावर पंचानी सहया केल्या व पोलीस निरीक्षक श्रीमती सुर्यवंशी मडम यांनी समक्ष म्हणुन सही केली.त्यानंतर काही वेळाने न्टी करप्शन ब्युरो कार्यालय औरंगाबाद येथुन मी ,पोलीस निरीक्षक श्रीमती सुर्यवंशी मडम व दोन पंच सापळा टिम मधील अंमलदार जिवडे ,घुगरे ,चव्हाण व चालक बागुल असे शासकीय वाहन क्रमांक एम एच 20 एएस 2525 मध्ये वैजापुर येथील एका अज्ञात ठिकाणी येऊन थांबलो व तेथे मला पोनि श्री सुर्यवंशी मडम यांनी सुचना दिल्या आणी पोना जिवडे यांनी त्यांचे कडील व्हाईस रेकर्डर सुरु करुन माझ्या गळयात दोरीच्या सहायाने अडकवुन दिला.त्यांनतर मी व पंच श्री 1 श्री अनिल खेडंके असे आम्ही दोघे मी उपलब्ध करुन घेतलेली माझी मोसा क्रमांक एम एच 20 सीएक्स 1021 वर बसुन पंचायत समीती वैजापुर येथे गेलो असता आमची मोसा पंचायत समीती येथील पार्कींग मध्ये उभी केली आणी मी पंच क्रमांक 1 श्री अनिल खेडंके असे पंचायत समीती येथील लेखा विभागात गेलो तेथे श्री दाभाडे कनिष्ठ सहाय्यक यांची भेट घेतली त्यांचे सोबत कामा संबधाने बोलणे झाले त्यांनतर मी व पंच क्रमांक 1 श्री अनिल खेडंके असे पंचायत समीती वैजापुर येथुन सापळा अधिकारी श्रीमती सुर्यवंशी मडम व टीम थांबलेल्या ठिकाणी आलो असता तेथे पोना जिवडे यांनी माझ्या गळयातील व्हाईस रेकर्डर काढुन बंद केला.त्यानंतर त्यामध्ये रेकर्ड झालेले संभाषण पोलीस निरीक्षक श्रीमती सुर्यवंशी ,दोन्ही पंच व सापळा पथकातील अंमलदार यांनी ऐकले त्यांमध्ये श्री रामु दाभाडे यांनी लाचेची मागणी केली असल्याचे निषपन्न झाले आहे. त्यानंतर काही वेळाने श्री रामु दाभाडे सहाय्यक यांनी मला लाचेची रक्कम घेऊन कार्यालयात बोलावले होते त्याप्रमाणे दिनांक 24/12/2020 रोजी सापळा अधिकारी श्रीमती सुर्यवंशी मडम यांनी सापळा पथकातील पंच व अंमलदार व मला सर्वांना सुचना दिल्या व मी सोबत आणलेले 1000/- रु. ज्यात

500/- रुपये दराच्या दोन नोटाचे नंबर घेऊन पथकातील कर्मचारी श्री घुगरे यांनी सदर नोटास पावडर लाऊन माझ्या पन्टच्या उजव्या खिशात ठेवले व पोना जिवडे यांनी त्यांचे कडील व्हाईस रेकर्डर सुरु करुन माझ्या गळयात अडकवुन दिला.त्यानंतर मी व पंच क्र.1 खेडके असे माझे मोसावर बसुन पंचायत समीती वैजापुर येथील लेखा विभागात गेलो तेथे माझी मोसा पार्कीग मध्ये उभी केली आणी पंचायत समीती वैजापुर येथील लेखा विभागात जाऊन श्री रामु दाभाडे कनिष्ठ सहाय्यक यांची भेट घेतले व तेथे आमचे कामा संबधाने चर्चा केली व लाच मागणीत ठरल्या प्रमाणे 1000/- रुपये माझ्या खिशातुन काढुन श्री रामु दाभाडे कनिष्ठ सहाय्यक यांचे समोर धरली असता त्यांनी सदर लाचेची रक्कम त्यांचे उजव्या हाताने स्विकारुन त्यांचे अंगातील पन्टचे उजवे बाजुचे खिशात ठेवली त्यावेळी 17.55 वाजले होते.त्याचवेळी मी गळयातील हात रुमाल सोडुन खाली फरशीवर टाकुण पथकास इशारा केला.त्यानंतर तात्काळ सापळा पथकाने श्री दाभाडे कनिष्ठ सहाय्यक यांना पकडुन त्यांचे कडुन लाचेची रक्कम जप्त केली असुन जप्त केलेल्या नोटांची व त्यांचे हाताची व अंगातील कपडयाची अल्ट्राव्हायलेट लम्पच्या प्रकाशात तपासणी केली असता श्री रामु दाभाडे यांचे उजव्या हाताचे बोटांवर, जप्त केलेल्या नोटांवर तसेच अंगातील पन्टचे उजव्या बाजुच्या खिशाचे तोडांवर व आतमध्ये ठिकठिकाणी थ्रासीन पावडरची हिरवट रंगाची चकाकी दिसुन आली. त्यानंतर माझ्या हातांची तपासणी केली असता माझ्या उजव्या हातांचे बोटावर तसेच अंगातील पन्टच्या समोरील उजव्या बाजचे तोडांवर व आतमध्ये न्थ्रासिन पावडरची हिरवट रंगाची चकाकी दिसुन आली आहे.त्यानंतर माझ्या कामासबंधीचे सेवापटातील पडताळणी करण्यात आलेले रजीस्टर ताब्यात घेण्यात आले त्यानंतर आम्ही पोलीस ठाणे वैजापुर येथे आलो .श्री रामु सोनाजी दाभाडे ,कनिष्ठ सहाय्यक यांचेशी माझा कोणताही उसनवारीचा व्यवहार नाही.तसेच वैर अगर दुश्मनी नाही. श्री रामु दाभाडे कनिष्ठ सहाय्यक यांनी माझ्या कडे माझे सेवापटात सहाव्या वेतन आयोगाचे पडताळणीची नोंद करण्यासाठी 1800/- रुपये लाचेची मागणी करुन पंचासमक्ष दिनांक 24/12/2020 रोजी तडजोडी अंती 1000/- रुपये लाच स्विकारली म्हणुन श्री रामु सोनाजी दाभाडे कनिष्ठ सहाय्यक जि.प.औरंगाबाद यांचे विरुध्द कायदेशिर कारवाई होणेस विंनती आहे. ही फिर्याद दिली सही

**13. Action** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले): Samratsing Vijaysing Rajaput(I (Inspector)) / PI **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद):

**No.**(क्र.): **to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

**14. Signature/Thumb impression of the complainant / informant.**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

24/12/2020

**15. Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station** (ठाणे प्रभारी अधिका-याची

**Name** (नाव): Samratsing Vijaysing Rajaput

**Rank**(पद): I (Inspector)

**No.**(सं.): PI

पोलीस ठाणे अंमलदार
पो.स्टे.वैजापूर